वाचले:-

१ नियुक्ती आदेश क्रमांक - साप्रवि/६अ/कावि/५४५/२०२२ दिनांक २२/०९/२०२२

२ मा. क्षेत्रीय अधिकारी, अ क्षेत्रीय कार्यालय, यांचेकडील पत्र क्र. अक्षेका/आ/३/कावि/१५४/२०२४ दिनांक १३/०६/२०२४

३ आदेश क्रमांक - प्रशा/२/कावि/७९५/२०१७ दिनांक ०१/११/२०१७

४ आदेश क्रमांक - प्रशा/२/कावि/७४/२०२१ दिनांक २८/०१/२०२१

५ सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक १०/०७/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८, सामान्य प्रशासन विभाग.
क्रमांक साप्रवि/६अ/कावि/२३५ /२०२४
दिनांक १०/०७ /२०२४

**विषय:- श्री.जाधव सौरभ विनायक, लिपिक (संगणक क्र.१३३९८) यांची नियुक्ती नियमित करणेबाबत....**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर श्री.जाधव सौरभ विनायक यांची वाचले क्र.१ चे आदेशान्वये पे लेवल एस-६ वेतनश्रेणी र.रु.१९९००-६३२०० या वेतन श्रेणीत लिपिक या पदावर रुजू तारखेपासुन प्रथमत: १ वर्ष परिविक्षाधीन कालावधीकरिता आदेशामध्ये नमुद केलेल्या अटी व शर्ती वर पुर्णत: हंगामी स्वरुपाची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार श्री.जाधव सौरभ विनायक हे दिनांक २३/०९/२०२२ रोजी सामान्य प्रशासन विभागात लिपिक या पदावर रुजू झाले आहेत. श्री.जाधव सौरभ विनायक यांचा लिपिक पदावरील परिविक्षाधीन कालावधी दिनांक २२/०९/२०२३ रोजी संपुष्टात आला आहे.

मा. क्षेत्रीय अधिकारी, अ क्षेत्रीय कार्यालय यांनी उपरोक्त वाचले क्र.२ च्या पत्रा अन्वये कामकाज अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये श्री.जाधव सौरभ विनायक यांचे परिविक्षाधीन कालावधीमधील कामकाज, हजेरी व वर्तणुक समाधानकारक आहे व त्यांच्या विरुध्द सदयस्थितीत कोणतीही खातेनिहाय चौकशी चालु अथवा प्रस्तावित नाही असे नमुद केले असून सोबत संगणक अर्हता, टंकलेखन इंग्रजी ४० श.प्र.. व मराठी ३० श.प्र.. उत्तीर्ण प्रमाणपत्र सादर केले आहे. तसेच त्यांची लिपिक पदावरील नियुक्ती नियमित करणेस स्पष्ट शिफारस केली आहे.

सबब मी उप आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, उपरोक्त वाचले क्रमांक ३ व ४ अन्वये प्राप्त अधिकारानुसार प्रस्तूतच्या आदेशान्वये **श्री.जाधव सौरभ विनायक** यांना **"लिपिक"** या पदावर **खुला** या प्रवर्गातुन देण्यात आलेली नियुक्ती, मुळ नियुक्ती आदेशातील अटी व शर्तींचे अधिन राहुन रुजू दिनांक २३/०९/२०२२ पासून नियमित करण्यास या आदेशान्वये मान्यता देणेत येत आहे.

प्रस्तुत आदेशाची नोंद उपरोक्त कर्मचा-याचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त,
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

प्रति, श्री.जाधव सौरभ विनायक, लिपिक

प्रत:- १. लेखा विभाग २. लेखापरीक्षण विभाग ३.साप्रवि टेबल क्र. ७,१०,१२,२२
४. साप्रवि विभाग- संगणक कक्ष
५. पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघ.
६. पिं.चिं.मनपा सेवकाची सहकारी पतसंस्था
७. संबंधित विभागप्रमुख - अ क्षेत्रीय कार्यालय